28 JUN 2025
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात बी. ए. भाग दोनच्या इतिहासाची पुस्तके व स्वयंअध्ययन साहित्याचे प्रकाशन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. चंद्रवदन नाईक, डॉ. महादेव देशमुख, डॉ. अवनीश पाटील, डॉ. सुरेश शिखरे, विभा अंत्रेडी आदी.

# दर्जेदार ई-कन्टेन्टही तयार करावा

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे आवाहन : क्रमिक पुस्तके प्रकाशन

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अभ्यास मंडळाने क्रमिक पुस्तकांची निर्मिती केली. आता दर्जेदार ई-कन्टेन्ट निर्मिती करण्यासाठीही प्रयत्न करावेत, असे . आवाहन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अभ्यास मंडळाच्या वतीने बी.ए.-भाग २ साठी तयार करण्यात आलेल्या सहा क्रमिक पुस्तके आणि तीन स्वयंअध्ययन साहित्य पुस्तकांचे प्रकाशन सोहळ्यात ते बोलत होते.




कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. चंद्रवदन नाईक यांनी केलेल्या आवाहनाला इतिहासाच्या शिक्षकांनी उत्तम प्रतिसाद दिल्यामुळेच क्रमिक पुस्तके विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देणे शक्य झाले आहे. विद्यापीठाच्या दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राकडील स्वयंअध्ययन साहित्याचे क्रमिक पुस्तकांमध्ये रुपांतर करण्याचा निर्णय कळीचा ठरला.

यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. महादेव देशमुख, डॉ. चंद्रवदन नाईक, इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. अवनीश पाटील, डॉ. कृष्णा पाटील, उपकुलसचिव विभा अंत्रेडी, डॉ. कविता गगराणी, दीपक काशीद, विनय शिंदे, उमेश भोसले, दिलीप मोहाडीकर, डॉ. नितीन रणदिवे, डॉ. मुफीद मुजावर, डॉ. चांगदेव बंडगर, योगेश पवार उपस्थित होते.

28 JUN 2025
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रोजगार कक्षाकडून ३२०० विद्यार्थ्यांना कौशल्य प्रशिक्षण; ४५० जणांना कंपन्यांमध्ये रोजगार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मध्यवर्ती रोजगार कक्षाने गत वर्षभरात प्रभावी कामगिरीची नोंद करीत एकूण ७४ विविध कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम राबविले, त्या माध्यमातून विद्यापीठासह संलग्नित महाविद्यालयांतील ३२०० विद्यार्थ्यांना प्रशिक्षित केले. त्याचबरोबर ४५० हून अधिक विद्यार्थ्यांना नामांकित उद्योग, व्यवसायांमध्ये रोजगार संधीही उपलब्ध करून दिली.

विद्यापीठाच्या मध्यवर्ती रोजगार कक्षाचे समन्वयक डॉ. राजन पडवळ यांनी ही माहिती दिली. रोजगार कक्षाने पूर्ण वर्षभरात एकूण ७४ प्रशिक्षण कार्यक्रम राबविले. त्या माध्यमातून ३२०० विद्यार्थ्यांना प्रशिक्षित केले. या प्रशिक्षणामध्ये रिझ्युमे लिहिणे, मुलाखतीचे तंत्र, कॉर्पोरेट कल्चर अशा अनेकविध बाबींचा समावेश होता. त्याचबरोबर विद्यार्थ्यांचे मॉक इंटरव्ह्यू घेऊन त्यांच्या मनातील मुलाखतीविषयी असणारी भीती नष्ट केली. परिणामी, सन २०२४-२०२५ या वर्षात शिवाजी विद्यापीठातील ४५० हून अधिक विद्यार्थ्यांना विविध नामांकित कंपन्यांत रोजगार संधी प्राप्त झाल्या. मध्यवर्ती रोजगार कक्षाने आतापर्यंत १२५ विविध नामवंत कंपन्यांना आमंत्रित करून कॅम्पस रिक्रुटमेंट ड्राईव्हचे आयोजन केले आहे.



शिवाजी विद्यापीठाच्या मध्यवर्ती रोजगार कक्षातर्फे कॅम्पस ड्राईव्हअंतर्गत ऑनलाईन परीक्षा घेतली जाते.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आणि कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्यासह सर्वच अधिकारी आणि अधिकार मंडळे यांच्या सहकार्याने आवश्यक ते उपक्रम वर्षभर नियमितपणे राबविले जातात. त्यामुळे देशातील आघाडीच्या कंपन्या रिक्रुटमेंट ड्राईव्हसाठी येत आहेत, ही आनंदाची बाब असल्याचे डॉ. पडवळ यांनी सांगितले.

28 JUN 2025
जनसंपर्क कक्ष
तरूण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात डॉ. नंदकुमार मोरे लिखित 'असे होते आपले शाहू महाराज' या चरित्रग्रंथाचे प्रकाशन करताना डॉ. जयसिंगराव पवार. सोबत अन्वर हुसेन, डॉ. गोरख थोरात, डॉ. अवनीश पाटील, डॉ. नंदकुमार मोरे, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे.

# शाहू महाराज दीनदलितांसाठी करुणेचा झरा

- ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या हृदयात दीनदलितांसाठी बुद्धाप्रमाणे करुणेचा झरा आणि आईप्रमाणे ममत्वभाव ओसंडून वाहात होता. डॉ. नंदकुमार मोरे यांच्या चरित्रग्रंथाच्या माध्यमातून या करुणासागराच्या संस्कारकथा बालकुमारांपर्यंत पोहोचणार आहेत, असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी केले.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठातील मराठी अधिविभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी लिहीलेल्या 'असे होते आपले शाहू महाराज' या चरित्रग्रंथासह त्याच्या इंग्रजी, हिंदी, कन्नड आणि गुजराती अनुवाद ग्रंथांचे प्रकाशन डॉ. पवार यांच्या हस्ते याप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. प्र–कुलगुरू डॉ. प्रमोद




पाटील प्रमुख उपस्थित होती.

डॉ. पवार म्हणाले, 'असे होते आपले शाहू महाराज' हे पुस्तक शिवाजी विद्यापीठामार्फत बालकुमारांसाठी प्रकाशित होणे ही अभिनव घटना आहे. शाहू महाराज हे त्यांना भेटणाऱ्या प्रत्येक घटकाची सातत्याने चिंता वाहात असत. भाई माधवराव बागल यांच्यापासून अनेक मुलांमधील सुप्त गुण हेरून त्यांना प्रोत्साहन देण्याचे काम महाराजांनी केले. लेखक डॉ. नंदकुमार मोरे म्हणाले, शाहू महाराज यांच्या या चरित्रग्रंथावर काम करताना त्यांचे अनेक पैलू सामोरे आले. अध्यक्षस्थानावरून कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, शाहू महाराज यांचे हे चरित्रग्रंथ साहित्य, इतिहास आणि कला यांचा त्रिवेणी संगम आहे. या पुस्तकाच्या हिंदी आवृत्तीचा अनुवादक डॉ. गोरख थोरात, चित्रकार अन्वर हुसेन यांनी केला. इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी प्रास्ताविक केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.

### पुस्तकाच्या हजार प्रतींची विक्री

'असे होते आपले शाहू महाराज' या ग्रंथाच्या एक हजार प्रतींची पहिल्याच दिवशी विक्री झाली. पहिल्या आवृत्तीची किंमत ५० रुपये आहे. त्यामुळे शाहू जयंतीचे औचित्य साधून दिवसभरात अनेक शाहूप्रेमींनी या पुस्तकाची खरेदी केली. अनेकांनी भेट देण्यासाठीही एकाहून अधिक प्रती खरेदी केल्या.

28 JUN 2025
लोकसत्ता
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शाहू महाराजांकडून तळातील माणसाला सत्तेचा राजमार्ग - डॉ जब्बार पटेल

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी



खासदार शाहू महाराज छत्रपती यांच्या हस्ते डॉ. जब्बार पटेल यांना 'राजर्षी शाहू पुरस्कार' प्रदान करण्यात आला. सोबत पालकमंत्री प्रकाश आबिटकर. (छाया - प्रफुल्ल सप्रे)

**कोल्हापूर :** तळागाळातील वंचित, शोषित समाजाला सत्तेच्या मार्गातून जोडण्याचा राजमार्ग राजर्षी शाहू महाराज यांनी देशाला दिला आहे. विविध धर्म, भाषा, संस्कृती आणि सामाजिक मूल्ये जपण्याचे कार्य करून देवत्वाच्याही पलीकडे जाणारा राजा म्हणजे राजर्षी छत्रपती शाहू महाराज होते. त्यांची समतेची शिकवण आत्मसात करून माणुसकी जपा, असे प्रतिपादन ज्येष्ठ नाट्य आणि चित्रपट दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांनी केले.

राजर्षी शाहू छत्रपती मेमोरियल ट्रस्टच्या वतीने यंदाचा 'राजर्षी शाहू पुरस्कार' डॉ. पटेल यांना खासदार शाहू महाराज छत्रपती यांच्या हस्ते एक लाख रुपये रोख, स्मृतीचिन्ह आणि मानपत्र अशा स्वरूपातील पुरस्कार प्रदान करण्यात आला.

कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस., पोलीस अधीक्षक योगेशकुमार गुप्ता, ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, शाहूप्रेमी उपस्थित होते. डॉ. अशोक चौसाळकर यांनी पटेल यांचा परिचय करून दिला.

शाहू महाराजांनी दिलेला समतेचा विचार डॉ. पटेल यांनी चित्रपटांच्या माध्यमातून रुजवला. कलेच्या माध्यमातून राज्याला नवी दिशा देण्याचे काम त्यांनी केले असल्याचे खासदार शाहू महाराज छत्रपती यांनी सांगितले.

**शाहू स्मारकाचे नूतनीकरण – आबिटकर**

शाहू महाराज प्रत्येकाच्या मनात आणि हृदयात आहेत. त्यांचे विचार आणि त्यांचे कार्य सर्वदूर पोहोचवण्याच्या दृष्टीने शाहू स्मारकाच्या नूतनीकरणासाठी जिल्हा वार्षिक योजनेतून पाच कोटींचा निधी देणार असल्याची घोषणा अध्यक्षीय भाषणात पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी केली.

**शाहूप्रेमींचे सहकार्य अपेक्षित –जिल्हाधिकारी**

जिल्हाधिकारी अमोल येडगे म्हणाले, शाहू महाराजांच्या कार्याचा प्रसार करण्याचे काम शाहू स्मारक ट्रस्ट करत असून, या वास्तूचे नूतनीकरण व आधुनिकीकरण करून नवनवीन उपक्रमांच्या माध्यमातून त्यांचे कार्य जगभरात पोहोचवण्यात येणार आहे. यासाठी शाहूप्रेमींनी योगदान द्यावे, असे आवाहन केले. मोहिनी चव्हाण यांनी मानपत्राचे वाचन केले. राजदीप सुर्वे यांनी आभार मानले.

28 JUN 2025

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातील ३२०० विद्यार्थ्यांना कौशल्य प्रशिक्षण

## ४५० जणांना रोजगार : शिवाजी विद्यापीठाच्या मध्यवर्ती रोजगार कक्षाची कामगिरी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मध्यवर्ती रोजगार कक्षाने गत वर्षभरात एकूण ७४ विविध कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम राबवले. त्या माध्यमातून विद्यापीठासह संलग्नित महाविद्यालयांतील ३२०० विद्यार्थ्यांना प्रशिक्षित केले. त्याचबरोबर ४५० हून अधिक विद्यार्थ्यांना नामांकित उद्योग, व्यवसायांमध्ये रोजगार संधीही उपलब्ध करून देण्यात यश प्राप्त केले आहे. विद्यापीठाच्या मध्यवर्ती रोजगार कक्षाचे समन्वयक डॉ. राजन पडवळ यांनी ही माहिती दिली.

डॉ. पडवळ यांनी दिलेल्या माहितीनुसार, शिवाजी विद्यापीठ विद्यार्थ्यांना रोजगारक्षम बनवण्यासाठी मध्यवर्ती रोजगार कक्ष प्रयत्नशील आहे. विद्यार्थी नोकरीक्षम बनण्यासाठी विविध कौशल्यांची वृद्धी करणे आवश्यक असते. हे लक्षात घेऊन कक्षाने प्रशिक्षणासाठी वर्षभराचे वेळापत्रक आखले. त्यानुसार पूर्ण वर्षभरात एकूण ७४ प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले. त्या माध्यमातुन ३२०० विद्यार्थ्यांना प्रशिक्षित केले. या प्रशिक्षणामध्ये



रिझ्युम लिहिणे, मुलाखतीचे तंत्र, कॉर्पोरेट कल्चर अशा अनेकविध बाबींचा समावेश होता. त्याचबरोबर विद्यार्थ्यांचे मॉक इंटरव्ह्यू घेऊन त्यांच्या मनातील मुलाखतींविषयी असणारी भीती घालवण्यात आली. त्यामुळे २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षात शिवाजी विद्यापीठातील ४५० हून अधिक विद्यार्थ्यांना विविध नामांकित कंपन्यांत रोजगार संधी प्राप्त झाली. यामध्ये इन्फोसिस, ॲक्सिस बँक, एन.पी.सी.आय., अदानी समूह, अमूल इंडिया, गद्रे मरिन एक्स्पोर्टस्, टॅको इत्यादी प्रथितयश कंपन्यांचा समावेश आहे. मध्यवर्ती रोजगार कक्षाने आतापर्यंत १२५ विविध नामवंत कंपन्यांना आमंत्रित करून कॅम्पस रिक्रुटमेंट ड्राईव्हचे आयोजन केले आहे. यातील काही कंपन्या पुनश्चः रिक्रुटमेंट ड्राईव्ह घेण्यास उत्सुक आहेत.